| महाराष्ट्र राज्य<br>माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,<br>नाशिक विभागीय मंडळ, सर्व्हे नं.१५६०/१<br>आडगांव शिवार,आडगांव नाशिक–४२२००३ | | Maharashtra State<br>Secondary & Higher Secondary Education,<br>Nashik Divisional Board, Serve No.1560/1<br>Adgaon Shivar, Adgaon, Nashik-422003. | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
|---|---|---|---|
| Website-sscboardnashik.com | | Email-nsksec@rediffmail.com | |

महत्वाचे / तात्काळ
परीक्षाप्राधान्य,

क्रमांक / ना.वि.मं / माध्य / खा.वि 1923
नाशिक: ४२२००३
दिनांक:–१०/०८/२०२३

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य
सर्व मान्यताप्राप्त
शाळा व कनिष्ठ महाविद्यालये,
(नाशिक, धुळे, जळगांव व नंदुरबार)

विषय :–माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) मार्च २०२४ परीक्षेस खाजगीरीत्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नांवनोंदणी प्रक्रियेबाबत....

संदर्भ:– राज्यमंडळाचे क्र.रा.मं./परीक्षा–३/३४६७ दि.०८/०८/२०२३ रोजीचे पत्र.....

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) खाजगीरीत्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी संपर्क केंद्रामार्फत नांवनोंदणी प्रक्रिया राबविण्यात येते. याबाबत सर्व कार्यवाही संपर्क केंद्रामार्फत राबविण्यात येत होती. तथापि काही त्रुटी निदर्शनास आल्याने सदरची संपर्क केंद्र कार्यपध्दती तसेच पध्दतीतील त्रृटी विचारात घेऊन सक्षम समितीच्या ठरावानुसार खाजगीरीत्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी योजना ही सुलभ व विद्यार्थी केंद्रीत व्हावी या दृष्टीने सध्याची संपर्क केंद्रामार्फत नांवनोंदणी बंद करून खाजगी विद्यार्थी नांवनोंदणी अर्ज सर्व मान्यताप्राप्त शाळांमधून स्विकारण्याची कार्यपध्दती मार्च २०२४ परीक्षेपासून निश्चित करण्यात आलेली आहे.

इ.१० वी चे नांव नोंदणी अर्ज स्किारण्याच्या तारखांचे नियोजन विद्यार्थी, पालक, शिक्षक व इतर सर्व संबंधित घटकांच्या आपण आपल्या स्तरावरून निदर्शनास आणून द्यावे. या पत्रासोबत नांव नोंदणी अर्जाबातच्या सूचना, माहिती व मार्गदर्शक पुस्तिका सोबत देण्यात येत आहे.

10/8

(डॉ.मच्छिंद्रनाथ कदम)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक–४२२००३

प्रत माहितीस्तव:–

१. मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिकशिक्षण मंडळ, राज्यमंडळ, पुणे–०४.
२. मा.शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक
३. शिक्षणाधिकारी (माध्य), नाशिक , धुळे , जळगांव व नंदुरबार

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ, नाशिक–०४खाजगी विद्यार्थ्यांनी नांव नोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना सूचना

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी (इ.१० वी) खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सध्या संपर्क केंद्रामार्फत नांवनोंदणी प्रक्रिया राबविण्यात येते. यामध्ये संपर्क केंद्रामार्फत सर्व कार्यवाही राबविण्यात येत होती. मात्र प्रचलित पध्दतींमधील अडचणींचा, त्रुटींचा विचार करून सदरची योजना जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना लाभदायी, सुलभ व विद्यार्थी केंद्रीत व्हावी या दृष्टीने सध्याची संपर्क केंद्र शाळेमार्फत नांवनोंदणी अर्ज स्विकारण्याची प्रचलित पध्दत बंद करून इ.१२ वी च्या विद्यार्थ्यांचे ज्या पध्दतीने सर्व कनिष्ठ महाविद्यालयांतून नांवनोंदणी अर्ज स्विकारण्यात येतात, त्याचप्रमाणे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी (इ.१० वी) च्या खाजगी विद्यार्थ्यांचे नांवनोंदणी अर्ज सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळांमधून स्विकारण्याची पध्दती मार्च २०२४ च्या परीक्षेपासून सुरू करण्यात येत आहे.

तरी सर्व माध्यमिक शाळांनी याची नोंद घेवून शिक्षण प्रवाहाच्या बाहेर राहिलेल्या परंतू किमान इ.५ वी उत्तीर्ण असलेल्या मुला–मुलींना माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस बसून शिक्षणाच्या प्रवाहात येण्याची संधी उपलब्ध करून देण्यात यावी. या संदर्भातील सर्व माहिति व मार्गदर्शक पुस्तिका मंडळाच्या **http://mahahsscboard.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

१. इ.१० वी खाजगी विद्यार्थी नांवनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या आहेत.

| अ.क्र | नांवनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्यासाठी तारखा | तपशिल |
|---|---|---|
| १ | सोमवार दि.१४ ऑगस्ट २०२३ ते सोमवार दि.११ सप्टेंबर २०२३ | विद्यार्थ्यांनी नांवनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरणे |
| २ | गुरूवार दि.१७ ऑगस्ट २०२३ ते बुधवार दि.१३ सप्टेंबर २०२३ | विद्यार्थ्यांनी मूळ अर्ज, ऑनलाईन नांवनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या माध्यमिक शाळेत जमा करणे. |
| ३ | शुक्रवार दि.१५ सप्टेंबर २०२३ | माध्यमिक शाळांनी विद्यार्थ्यांचे अर्ज, ऑनलाईन नांवनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचापावतीची एक छायाप्रत, मूळ कागदपत्रे व यादी विभागीय मंडळाकडे करणे |

२. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१० वी साठी नांव नोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरवात करावी. संकेतस्थळ–**http://form17.mh-ssc.ac.in** .

४. विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरीता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास व्दितीय प्रत व प्रतिज्ञा पत्र २) आधारकार्ड ३) स्वत:चा पासपोर्ट आकाराचा फोटो स्वत: जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरतांना सदर कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहेत. काही कारणास्तव विद्यार्थ्यांकडे दुय्यम शाळा सोडल्याचा दाखला असेल तर त्याची मूळप्रत जोडणे आवश्यक आहे.

५. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावे. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई–मेल आय.डी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

६. संपूर्ण अर्ज भरून झाल्यावर अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई–मेल वर पाठविली जाणार आहे. तसेच या संपूर्ण भरलेलया अर्जाची प्रिंटआऊट, ऑनलाईन शुल्क भरल्याची पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.

७. विद्यार्थ्यांनी अर्ज, ऑनलाईन नांवनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे नांवनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या माध्यमिक शाळांमध्ये विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.

८. खाजगी विद्यार्थ्यासाठी नांवनोंदणी शुल्काचा तपशिल खालीलप्रमाणे–

रू.१०००/– नोंदणी शुल्क + रू.१००/– प्रक्रिया शुल्क **(Processing fee)**

९. विद्यार्थ्यांनी शाळेत अर्ज व ऑनलाईन शुल्क भरल्याच्या पावतीची छायाप्रत जमा केल्यानंतर संबंधित शाळांनी सर्व अर्ज एकत्रित करून पुढिल नमुन्यातील यादी, मूळ अर्जासोबतची कागदपत्रे,

ऑनलाईन नांवनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची एक छायाप्रत मंडळ कार्यालयात जमा करून त्याबाबतची पोहोच घ्यावी कोणताही विद्यार्थी या सुविधेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र | अर्ज क्रमांक | विद्यार्थ्याचे संपूर्ण नांव | शुल्क (रूपये) | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१०. खाजगी क्लासेसकडून जर विद्यार्थ्यांचे फॉर्म नं.१७ बंचमध्ये येत असतील तर त्याची नोंद स्वतंत्रपणे ठेवण्यात यावी व चौकशी करण्यात यावी.

११.सदरील काम करणाऱ्या शाळेतील मुख्याध्यापक/जेष्ठ शिक्षक व लिपिक यांना या कामाबाबत पुढील दराने मानधन देण्यात यावे.

अ) मुख्याध्यापक तथा जेष्ठ शिक्षक—

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यंत | रू. १५०/— |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रू. १५०/— + १०/— प्रति विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रू. ५००/— |

ब) लिपिक —

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यंत | रू. १००/— |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रू. १००/— + १०/— प्रति विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रू. २००/— |

१२. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची नांवनोंदणी होणार आहे. नांवनोंदणी करतांना विद्यार्थ्यांच्या पत्त्यानुसार त्याने निवडलेल्या माध्यमानुसार माध्यमिक शाळांची यादी दिसेल. त्यातील एका माध्यमिक शाळेची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या माध्यमिक शाळेने परीक्षेचा अर्ज प्रकल्पांतर्गत मुल्यमापन, प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी विषयासंदर्भातील कामकाज व अनुषंगिक मुल्यमापन करावयाचे आहे.

१३. इ.१० वी साठी विद्यार्थ्यांनी जी शाळा निश्चित केली असेल त्या शाळांनी विद्यार्थ्यांची प्रकल्पांतर्गत मुल्यमापन, प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी परीक्षा घ्यावयाची आहे. व या संदर्भातील गुण ओ.एम.आर (**OMR**) गुणपत्रिकेवर नोंदवून विहित मुदतीत मंडळ कार्यालयात जमा करावयाचे आहे.

१४. एखादा विद्यार्थी कागदपत्रांची छाननी केल्यानंतर कागदपत्रांची पुर्तता करण्यास असमर्थ असल्यास अशा विद्यार्थ्यास अपात्र ठरविण्यात येईल व सदर अपात्र विद्यार्थ्यास प्रक्रिया शुल्काचे रू.१००/— (अक्षरी रूपये शंभर ) वगळून उर्वरीत रक्कम यथावकाश परत करण्यात येईल.

१५. स्वाध्यायपुस्तिका ऑनलाईन मंडळाच्या संकेतस्थळावर सरावासाठी इंग्रजी, मराठी, हिंदी व उर्दू माध्यमात उपलब्ध होतील. याबाबत संबंधित विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक/विषय शिक्षकांकडून सूचना व मार्गदर्शन देणेबाबत सूचित करावे. स्वाध्याय पुस्तिका ऑफलाईन पध्दतीने देण्यात येणार नसल्याने स्वाध्याय पुस्तिका सोडवून त्या तपासणे व त्यांचे गुण कळविणे ही पध्दत बंद करून नियमित विद्यार्थ्यांची तोंडी, प्रात्यक्षिक, श्रेणी, अंतर्गत मूल्यमापनाची परीक्षा घेऊन या परीक्षाचे गुण विहित मुदतीत मंडळ कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

१६. शाळा सोडल्याचा दिनांक व दाखला दिल्याचा दिनांक याबाबत पात्रतेसाठी शाळा सोडल्याचा दिनांक ग्राह्य धरण्यात यावा. दि.३० जून पूर्वी विद्यार्थ्याचा शाळा सोडल्याचा दाखला असणे आवश्यक आहे. व दि.०१ जुलै रोजी कोणत्याही मान्यताप्राप्त शाळेच्या हजेरीपटावर विद्यार्थ्याचे नांव असणार नाही खात्री करावी.

१७. पात्र/अपात्र विद्यार्थी निश्चित झाल्यानंतर नांवनोंदणी प्रमाणपत्र (**E.C**) ऑनलाईन तयार होणार असल्याने याबाबत करावयाच्या कार्यवाहीच्या सूचना स्वतंत्रपणे देण्यात येतील.

१८. इ. १० वी मार्च—२०२४ साठी खाजगी विद्यार्थी फॉर्म नं.१७ ऑनलाईन नांवनोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (**Debit Card/Credit Card/UPI/Net banking**) व्दारे भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्यानंतर विद्यार्थ्याला पोचपावती प्राप्त होईल. सदर पोचपावती स्वत: जवळ ठेवून त्याच्या दोन छायाप्रती विद्यार्थ्याने माध्यमिक शाळेस जमा कराव्यात तसेच विद्यार्थ्याने एकदा नांवनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव नांवनोंदणी शुल्क परत केले जाणार नाही. तसेच नांवनोंदणी अर्जात दुरूस्ती करावयाचे (माध्यम, शाळा अथवा अन्य कारणास्तव ) असल्यास विद्यार्थ्यास पुनश्च: नांवनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन जमा करावे लागेल, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

१९. विद्यार्थ्यांच्या अर्जासोबत छाननीसाठी प्राप्त झालेली मूळ कागदपत्रे अर्जाची छाननी झाल्यानंतर शाळांना परत करण्यात येईल.

२०. दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ठ व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकीत्सकांच्या/प्राधिकृत केलेल्या हॉस्पिटलच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावी. दिव्यांग विद्यार्थ्यांना विषययोजना तसेच परीक्षेसाठी असलेल्या सवलती याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

२१. पात्र विद्यार्थ्यांना नांव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना माध्यमिक शाळांनी द्यावयाची कार्यवाही करावी.

२२. ज्या शाळांमधून विद्यार्थी परीक्षेचा फॉर्म भरण्यात आहे. त्याच माध्यमिक शाळेमार्फत फॉर्म संदर्भातील अनुषंगिक कागदपत्रे मंडळात जमा करावी.

२३. *माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी प्रत्येक शाळेने आपल्याच शाळेतील माजी विद्यार्थी, आपल्याचा गावातील विद्यार्थी किंवा सद्याच्या पत्त्यानुसार नजीकच्या परीसरातील विद्यार्थी यांचेच फॉर्म प्रवेशित क्षमतेच्या मर्यादित (५०) स्विकारावेत. तसेच जी शाळा आपल्या माजी विद्यार्थ्यांचे तसेच आपल्या परीसरातील विद्यार्थ्यांचे नांव नोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) स्विकारीत नाहीत अशी तक्रार प्राप्त झाल्यास त्या शाळेविरूध्द कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.*

२४. ५० विद्यार्थी क्षमतेपेक्षा जास्त म्हणजे ५१ ते १०० विद्यार्थी क्षमतेसाठी संबंधित माध्यमिक शाळांनी मंडळाची परवानगी घेणे अनिवार्य राहील. तद्नंतर वाढीव मर्यादा मान्य करण्यात येईल सदरची ही वाढीव मर्यादा अंतीम असेल यानंतर विद्यार्थी क्षमता वाढविता येणार नाही याची नोंद घ्यावी.

10/8/2023

(डॉ.मच्छिंद्रनाथ कदम)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक—४२२००३

प्रत माहितीस्तव:—

१. मा.सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्यमंडळ, पुणे—०४.
२. मा.शिक्षण उपसंचालक, नाशिक विभाग, नाशिक
३. शिक्षणाधिकारी (माध्य), नाशिक , धुळे , जळगांव व नंदुरबार

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४.

# माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा
## इयत्ता १० वी

खाजगी विद्यार्थी
थेट अर्ज योजना

## खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७)
## माहिती व मार्गदर्शक सूचना

# माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी)
# खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७) नाव नोंदणी थेट अर्ज योजना

प्रस्तावना :-

प्रतिकूल परिस्थितीमुळे नियमित शाळेतून इ.१०वी पर्यंतचे शिक्षण पूर्ण करू न शकणाऱ्या मुला-मुलींची संख्या राज्यात लक्षणीय आहे. काही मुले-मुली प्राथमिक स्तरावर तर काही उच्च प्राथमिक स्तरावर शाळा सोडून जातात. शिक्षणाची तीव्र इच्छा असूनदेखील आर्थिक, सामाजिक व अन्य संयुक्तीक कारणामुळे ही मुले-मुली माध्यमिक शिक्षणाचा टप्पा पूर्ण करू शकत नाही. अर्धवट शाळा सोडणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मुलींचे प्रमाण तुलनेने बरेच जास्त असते. परिसरात माध्यमिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नसणे, हलाखीची आर्थिक परिस्थिती, त्यामुळे करावी लागणारी मोलमजुरी पालकांचे स्थलांतर व सामाजिक रूढीची बंधने या सर्वसाधारण कारणामुळे बरेच मुले-मुली शिक्षणापासून वंचित राहतात, परिणामतः त्यांची शारीरिक, मानसिक व बौध्दिक वाढ अपेक्षेप्रमाणे होत नाही.

• शिक्षण प्रवाहाच्या बाहेर राहिलेल्या परंतु किमान इ.५वी उत्तीर्ण असलेल्या मुला-मुलींना माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस बसून शिक्षणाच्या प्रवाहात परत येण्याची संधी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने उपलब्ध करून देऊन एक महत्वपूर्ण पाऊल उचललेले आहे.

काही कारणामुळे शिक्षण प्रवाहाच्या बाहेर राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी सदरची खाजगी विद्यार्थी फॉर्म नं.१७ ही योजना मंडळाने सुरू केली आहे.

यामध्ये संपर्क केंद्रामार्फत सर्व कार्यवाही करण्यात येत होती. मात्र यामध्ये खालीलप्रमाणे काही त्रुटी निदर्शनास येत आहेत.

१) काही संपर्क केंद्रामधून मंडळाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षाही जास्त शुल्क अनाधिकृत घेण्यात येते.

२) काही संपर्क केंद्रामार्फत विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क घेऊन इ. १० वी परीक्षेत उत्तीर्ण करण्याची हमीसुद्धा विद्यार्थ्यांना देण्यात येते.

३) या जादाच्या शुल्कामुळे गरीब/मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांना एवढी मोठी रक्कम भरणे शक्य नसल्याने असे विद्यार्थी पुन्हा शिक्षणापासून वंचित राहतात.

४) मंडळाने ठरवून दिलेल्या मर्यादेपेक्षा जास्त विद्यार्थी संख्या घेणे.

५) शाळेच्या परिसरातील विद्यार्थ्यांपेक्षा बाहेरील गावातील, जिल्हयातील व इतर विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील विद्यार्थ्यांचे अर्ज स्विकारले जातात.

• उपरोक्तप्रमाणे प्रचलित योजनेतील त्रुटी विचारात घेता खाजगीरित्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसंबधी योजना ही सुलभ व विद्यार्थी केंद्रीत व्हावी या दृष्टीने सध्याची संपर्क केंद्रामार्फत नावनोंदणी करण्याची कार्यपध्दती बंद करून, खाजगी विद्यार्थी फॉर्म सर्व शाळांमधून स्विकारण्याबाबतची कार्यपध्दती खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहे.

मंडळ नियमावलीच्या नियम क्र. ४२ नुसार, नियमित शाळेत जावून आपले शिक्षण पूर्ण करू न शकणाऱ्या अथवा शिक्षण मध्येच सोडलेल्या विद्यार्थ्यांना खाजगी विद्यार्थी मान्यता प्राप्त शाळेमार्फत मंडळाचा अर्ज क्र. १७ भरून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेकरिता परीक्षेस प्रविष्ठ होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

अ) या योजनेची ठळक वैशिष्टे खालीलप्रमाणे–

१. किमान इयत्ता ५ वी ची परीक्षा मान्यताप्राप्त शाळेतून उत्तीर्ण झालेल्या व दिनांक ३१ जुलै रोजी किमान वयाची १४ वर्षे पूर्ण करणारी कोणतीही व्यक्ती खाजगी विद्यार्थी म्हणून नाव नोंदणी करण्यास पात्र राहील.

२. नियमितपणे शाळेत जाऊन परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्याप्रमाणेच, विषय योजना असलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस बसण्याची संधी, त्यामुळे परीक्षेच्या दर्जामध्ये व पद्धतीमध्ये बदल नाही.

३. स्वाध्यायपुस्तिका ऑनलाइन पद्धतीने मंडळाच्या संकेतस्थळावर सरावासाठी इंग्रजी, मराठी, हिंदी व उर्दू माध्यमात उपलब्ध होतील.याबाबत संबंधित शाळेचे मुख्याध्यापक / विषय शिक्षकांकडून सूचना व मार्गदर्शन मिळेल.

४. विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रात्यक्षिकांचा सराव व त्याद्वारे प्रात्यक्षिकाची तयारी नावनोंदणी केलेल्या शाळांमार्फत करण्यात येईल.

५. नियमित विद्यार्थ्यांसाठी असणाराच अभ्यासक्रम खाजगी विद्यार्थ्यांसाठी राहणार असून परीक्षा संचालन व परीक्षोत्तर बाबींसाठी इतर नियमित विद्यार्थ्यांप्रमाणेच सर्व नियम व कार्यपद्धती खाजगी विद्यार्थ्यांना लागू राहतील.

६. तोंडी,अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी विषयांची तयारी व परीक्षा यांची व्यवस्था शाळेमार्फत करण्यात येईल

ब) नावनोंदणी पात्रतेसाठी आवश्यक अटी

| परराज्यातील / परदेशातील विद्यार्थी | महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थी |
|---|---|
| १) परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्यास खाजगी विद्यार्थी म्हणून माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस बसण्याची विद्यार्थ्यांची इच्छा असेल त्या परीक्षेच्या प्रारंभाच्या तारखेच्या आधी तो किमान दोन वर्षे महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्यांचा (तलाठी/ग्रामसेवक/तहसिलदार/शासन नागरी सुविधा केंद्रामध्ये प्राधिकृत केलेले शासकीय अधिकारी) रहिवास दाखला सादर करणे बंधनकारक असेल, अपवादात्मक प्रकरणामध्ये विभागीय अध्यक्ष यांना महाराष्ट्र राज्यात दोन वर्षे राहण्याच्या कालावधीमधील तूट क्षमापित करण्याचा अधिकार असेल.<br>२) भारताचा नागरिक असलेला एखादा उमेदवार, परदेशातील माध्यमिक शाळेचा नियमित विद्यार्थी असेल आणि त्याने माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस समतुल्य म्हणजे (सिनियर केंब्रिज वा तत्सम अन्य) परीक्षेचा अभ्यासक्रम पूर्ण केला असेल तर त्याला खाजगी उमेदवार | १) विद्यार्थी मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेमध्ये किमान ५ वी इयत्ता उत्तीर्ण झालेला असावा व त्याकरिता त्याने आवश्यक तो पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला) सादर करावा.<br>२) विद्यार्थ्यांची ज्या वर्षाच्या मार्चमध्ये घेण्यात येणाऱ्या इ.१० वी परीक्षेस बसण्याची इच्छा असेल तर त्याला त्या शैक्षणिक वर्षात कोणत्याही मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेच्या हजेरीपटावर नियमित विद्यार्थी म्हणून नाव दाखल करता येणार नाही.<br>३) संबंधित विभागीय मंडळाकडे नाव नोंदविताना विद्यार्थ्याने वयाची १४ वर्षे पूर्ण केलेली असतील. त्यासाठी जन्मतारखेचा आवश्यक पुरावा तो सादर करील. |

| | |
|---|---|
| म्हणून परीक्षेस प्रविष्ठ होण्यास परवानगीसाठी नावनोंदणी करता येईल, परंतु अशा उमेदवारास सक्षम प्राधिकाऱ्यांचा (तलाठी/ग्रामसेवक/तहसिलदार/शासन नागरी सुविधा केंद्रामध्ये प्राधिकृत केलेले शासकीय अधिकारी) रहिवास-दाखला सादर करणे बंधनकारक असेल.<br>३) परराज्यातील विद्यार्थी मान्यताप्राप्त प्राथमिक शाळेमध्ये किमान ५ वी इयत्ता उत्तीर्ण झालेला असावा व त्याकरिता त्याने आवश्यक तो पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला) सादर करावा.<br>४) परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्यांची ज्या वर्षाच्या मार्चमध्ये घेण्यात येणाऱ्या इ.१० वी परीक्षेस बसण्याची इच्छा असेल तर त्याला त्या शैक्षणिक वर्षात कोणत्याही मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेच्या हजेरीपटावर नियमित विद्यार्थी म्हणून नाव दाखल करता येणार नाही.<br>५) परराज्यातील/परदेशातील विद्यार्थ्याने संबंधित विभागीय मंडळाकडे नाव नोंदविताना वयाची १४ वर्षे पूर्ण केलेली असतील. त्यासाठी जन्मतारखेचा आवश्यक पुरावा तो सादर करील. | |
| शाळा सोडल्याच्या दाखल्यामधील शाळा सोडल्याचा दिनांक व दाखला दिल्याचा दिनांक यापैकी पात्रतेसाठी शाळा सोडल्याचा दिनांक ग्राह्य धरण्यात यावा. | |

क) नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाच्या सूचना

१) खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१० वीसाठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहे. त्यामुळे कोणाचाही ऑफलाइन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

२) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी.

संकेतस्थळ - **http://form17.mh-ssc.ac.in**

नावनोंदणीच्या तारखा स्वतंत्र परिपत्रकाद्वारे जाहीर करण्यात येतील.

३) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन होणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यास त्याच्या पत्त्यानुसार व त्याने निवडलेल्या शाळांच्या यादीतून दिसेल त्यापैकी विद्यार्थी शेवटी ज्या शाळेत जात होता ती शाळा किंवा सध्या रहात असलेल्या, घरच्या पत्त्यानुसार किंवा नोकरीच्या ठिकाणाच्या पत्त्यानुसार जवळच्या शाळेची निवड विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्ज भरतांना करावयाची आहे. या शाळेद्वारे परीक्षा अर्ज, प्रकल्प, प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी विषया संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन करावयाचे आहे.

४) विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरिता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत) २) मूळ प्रत नसल्यास, द्वितीय प्रत व द्वितीय प्रत असल्याचे प्रतिज्ञापत्र ३) आधारकार्ड ४) फोटो ५) परराज्य/परदेशातील विद्यार्थ्यांस महाराष्ट्रातील रहिवासाबाबत सक्षम प्राधिकाऱ्यांचा (तलाठी/ग्रामसेवक/तहसिलदार/शासन नागरी सुविधा केंद्रामध्ये प्राधिकृत केलेले शासकीय अधिकारी) रहिवास दाखला ऑनलाईन अर्ज भरताना आवश्यक असून सदर कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहेत.

५) कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/ मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

६) संपूर्ण अर्ज भरून झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठवली जाणार आहे. तसेच या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट, ऑनलाइन शुल्क भरल्याची पावती व हमीपत्र यांच्या दोन प्रती काढून ठेवाव्यात.

७) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्यानंतर प्राप्त होणाऱ्या पोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे नाव नोंदणी अर्जावर नमूद केलेल्या शाळेमध्ये विहित मुदतीत जमा करावयाची आहेत. खाजगी विद्यार्थ्यांसाठी नाव नोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे –

इ. १० वी – रु. १०००/- नोंदणी शुल्क + रु. १००/- प्रक्रिया शुल्क (Processing fee)

८) विद्यार्थी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस ज्या विद्यार्थ्यास नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) मिळाल्यानंतर विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाला नाही तरी त्याला शुल्क परत केले जाणार नाही.

ड) <u>नाव नोंदणी अर्ज (अर्ज क्र. १७) विभागीय मंडळाकडे पाठविण्याचे संदर्भात माध्यमिक शाळांसाठी सूचना</u>

१) अर्ज क्रमांक १७ हा खाजगी विद्यार्थी म्हणून मंडळाकडे नाव नोंदणी करावयाचा अर्ज आहे. तसेच परीक्षेचे आवेदनपत्र स्वतंत्र असते व नावनोंदणी प्रमाणपत्र मिळाल्यानंतर ते स्वतंत्रपणे भरावे लागते याबाबत विद्यार्थ्यांना स्पष्ट कल्पना द्यावी.

२) अपूर्ण/चुकीची माहिती नोंदविलेल्या, अपूर्ण कागदपत्र असलेल्या, कमी शुल्क भरलेल्या नाव नोंदणी अर्जावर (फॉर्म नं.१७)कार्यवाही केली जाणार नाही. तसेच पोस्टाद्वारे पाठविलेले अर्ज स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

३) आपल्या परिसरातील किमान ५० विद्यार्थी प्रवेश क्षमते अंतर्गत इ. ५ वी उत्तीर्ण झालेल्या व दिनांक ३१ जुलै रोजी वयाची १४ वर्षे पूर्ण असलेल्या तसेच आपल्या शाळेतील माजी विद्यार्थ्यांचे प्राधान्याने नाव नोंदणी अर्ज क्र. १७ स्विकारणे आपणास बंधनकारक आहे. दि. ३० जून पूर्वी विद्यार्थ्याचा शाळा सोडल्याचा दाखला असणे आवश्यक आहे व १ जुलै रोजी कोणत्याही मान्यताप्राप्त शाळेच्या हजेरीपटावर त्याचे नाव असणार नाही.

मान्य प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त वाढीव ५० विद्यार्थी क्षमता वाढवून पाहिजे असल्यास त्यासाठी विभागीय मंडळाची लेखी पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

४) खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना नवीन/सुधारित अभ्यासक्रम लागू असून, नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांची भाषा विषयातील तोंडी ,अंतर्गत मूल्यमापन ,प्रात्यक्षिक व श्रेणी विषयांची परीक्षा पूर्ण करून घेण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांची राहील.

५) आपल्या शाळेस विभागीय मंडळाने मंजूर केलेल्या विषय व माध्यमाच्या विद्यार्थ्यांची फॉर्म नं. १७ आपल्या शाळेतून सादर केले जातील याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

६) विभागीय मंडळाने ज्या शाळांना चालू शैक्षणिक वर्षात प्रथम मान्यता दिलेली आहे अशा शाळांनी त्यांचे स्वताचे माजी विद्यार्थी वगळता अन्य विद्यार्थ्यांचे अर्ज क्र. 17 पुढील 3 वर्षा पर्यन्त पाठविण्यात येऊ नये.

७) कोणत्याही खाजगी विद्यार्थ्यास तांत्रिक / व्यावसायिक गटातील विषय माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेसाठी घेता येणार नाहीत. तसेच विषय योजनेप्रमाणे (शासन निर्णय दि.०८ ऑगस्ट २०१९ नुसार) विषयाची निवड विद्यार्थ्याने केल्याची खात्री करावी. चुकीच्या विषयाची निवड (Wrong Combination) विद्यार्थ्याने केल्याचे निदर्शनास आल्यास व त्यामुळे विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी मुख्याध्यापकांची राहील.

८) परीक्षेचे आवेदनपत्र विद्यार्थ्यांकडून निर्धारित मुदतीत भरून घेणे, विद्यार्थ्यांच्या तोंडी / प्रात्यक्षिक परीक्षेचे आयोजन करून मंडळास निर्धारित मुदतीत गुण कळविणे, शालेय विषयांची परीक्षा घेऊन निर्धारित मुदतीत त्याची श्रेणी मंडळास कळविणे व याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे याची संपूर्ण जबाबदारी मुख्याध्यापकांची आहे.

९) खाजगी विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) स्वीकारताना आपल्याच विद्यालयातील माजी विद्यार्थी, आपल्याच गावातील विद्यार्थी किंवा सध्याच्या पत्त्यानुसार नजीकच्या परिसरातील विद्यार्थी यांचेच फॉर्म प्रवेशित क्षमतेच्या मर्यादितच (५०) स्विकारावेत. तसेच ज्या माध्यमिक शाळा आपल्या माजी विद्यार्थ्यांचे तसेच आपल्या परिसरातील विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) स्वीकारीत नाहीत अशी तक्रार प्राप्त झाल्यास त्या शाळेविरुद्ध योग्य ती कारवाई करण्यात येईल.

१०) नियमित विद्यार्थ्यांप्रमाणेच खाजगी विद्यार्थ्यांचे स्वतंत्र निर्गम उताऱ्याप्रमाणे (जनरल रजिस्टरप्रमाणे) नोंदी ठेवाव्यात व आपल्या माध्यमिक शाळेमार्फत नाव नोंदणी करून परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यास माध्यमिक शाळा सोडल्याच्या दाखल्या ऐवजी सोबत दिलेल्या विहीत नमुन्यातील (प्रपत्र- क्रमांक - क ) प्रमाणपत्र द्यावे.

११) नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं १७ ) हा परीक्षेचा फॉर्म नसून तो केवळ खाजगीरित्या परीक्षेसाठी प्रविष्ठ होण्यास पात्रता ठरविण्यासाठी केलेला अर्ज आहे. याची विद्यार्थ्यांना नाव नोंदणी अर्ज (फॉर्म नं १७ ) भरताना लेखी सूचना देऊन पोहोच जतन करून ठेवावी. मंडळाने त्यास पात्र ठरवून नाव नोंदणी प्रमाणपत्र दिलेल्या सर्व खाजगी विद्यार्थ्यांच्या परीक्षेची आवेदनपत्रे विहित शुल्कासह निर्धारित मुदतीत मंडळाकडे सादर करणे आवश्यक आहे.

१२) मंडळाकडे सादर करण्यात आलेल्या आवेदनपत्राबाबतची माहिती सर्व माध्यमिक शाळांनी सूचना फलकावर लावावी. सर्व मुख्याध्यापकांनी स्वतः लक्ष घालून सर्व संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षेच्या वेळापत्रकाबाबत सविस्तर सूचना द्याव्यात. विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे माध्यमिक शाळेने मंडळाकडे सादर करणे, मंडळाकडून प्राप्त झालेल्या त्रुटींचा तपशील विद्यार्थ्यांना व पालकांना कळविण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांची राहील.

१३) एकदा इ. १० वी परीक्षा उत्तीर्ण / अनुत्तीर्ण तसेच तुरळक विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ज क्र. १७ भरता येणार नाही. अशा विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज मंडळाकडे पाठवू नयेत, असे अर्ज प्राप्त होऊन विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झाले असल्याचे निदर्शनास आल्यास मंडळ विनियम ५५ नुसार कारवाई करण्यात येईल.

१४) या विद्यार्थ्यांची शालेय श्रेणी विषयांची परीक्षा मंडळाच्या वेळापत्रकानुसार घेण्यात येईल व त्यांनी मिळविलेली श्रेणी प्रचलित पद्धतीप्रमाणे श्रेणी तक्त्यात भरुन ते श्रेणी तक्ते मीलबंद ठेवण्यात येतील. शाळेतील इतर विद्यार्थ्यांच्या श्रेणी तक्त्यासोबत ते मंडळास सादर करण्यात येतील.

१५) ३०० गुणांच्या तीन भाषा विषयांचा गट उत्तीर्णतेसाठी एकत्रित असेल. या तीन भाषा विषयांच्या एकत्रित गटामध्ये उत्तीर्णतेसाठी किमान १०५ गुण आवश्यक राहतील आणि त्यापैकी १०० गुणांच्या भाषा विषयामध्ये किमान २५% (म्हणजे १०० पैकी किमान २५ गुण) आणि संयुक्त भाषा विषयांच्या ५० गुणांच्या भाषा विषयात किमान २५% (म्हणजे ५० पैकी किमान १३ गुण) आवश्यक राहतील.

१६) या विद्यार्थ्यांची विज्ञान आणि तंत्रज्ञान विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा इतर नियमित विद्यार्थ्यांसोबत घेण्यात येईल.

१७) प्रचलित पद्धतीप्रमाणे उत्तीर्णतेसाठी गणित व विज्ञान विषयांचा एकत्रित गट असेल. या दोन विषयांच्या एकत्रित गटामध्ये उत्तीर्णतेसाठी किमान ७० (३५%) गुण व त्यापैकी कोणत्याही एका विषयात किमान २५% गुण म्हणंजे विज्ञान विषयात १०० पैकी किमान २५ किंवा गणित विषयात १०० पैकी किमान २५ गुण आवश्यक असण्याची प्रचलित तरतूद कायम आहे.

१८) विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयाच्या १०० गुणांमध्ये ८० गुण लेखी परीक्षा व २० गुण प्रात्यक्षिक परीक्षेसाठी आहेत. लेखी परीक्षेसाठी ४०-४० गुणांच्या स्वतंत्रपणे दोन प्रश्नपत्रिका राहील. त्यासाठी स्वतंत्रपणे २ तास राहील. उत्तीर्णतेसाठी ३५% गुणांची आवश्यकता राहिल.

१९) बीजगणित व भूमिती या विषयाच्या १०० गुणांमध्ये ८० गुण लेखी परीक्षा व २० गुण अंतर्गत मूल्यमापन परीक्षेसाठी आहेत. लेखी परीक्षेसाठी ४०-४० गुणांच्या स्वतंत्रपणें दोन प्रश्नपत्रिका राहील. त्यासाठी स्वतंत्रपणे २ तास राहील. उत्तीर्णतेसाठी ३५% गुणांची आवश्यकता राहिल.

२०) सामाजिकशास्त्रे या विषयाच्या १०० गुणांमध्ये ८० गुण लेखी परीक्षा व २० गुण अंतर्गत मूल्यमापन परीक्षेसाठी आहेत. लेखी परीक्षेसाठी ४०-४० गुणांच्या स्वतंत्रपणे दोन प्रश्नपत्रिका राहील. त्यासाठी स्वतंत्रपणे २ तास राहील. उत्तीर्णतेसाठी ३५% गुणांची आवश्यकता राहिल.

२१) इ.१०वीच्या नियमित परीक्षेसाठी कोणताही (फॉर्म नं. १७ सहित) खाजगी विद्यार्थी शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्तावांच्या सवलतीच्या अतिरिक्त गुणांसाठी पात्र राहील. तसेच क्रीडा सवलतीचे गुण केवळ उत्तीर्ण होण्यासाठी लागू राहतील. संबंधित विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेमार्फत सदर प्रस्ताव विहित नमुन्यात व विहित मुदतीत प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतिसह मान्यतेसाठी मंडळ कार्यालयात सादर करणे आवश्यक राहील.

२२) या योजनेअंतर्गत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ठ होणारा विद्यार्थी कोणतेही बक्षीस किंवा शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र असणार नाही.

२३) विद्यार्थ्याने निवड केलेल्या शाळेत जे शालेय/वैकल्पिक विषय शिकविले जात असतील तेच विषय घेणे विद्यार्थ्यास बंधनकारक राहील. या विषयांच्या परीक्षा संबंधित शाळेने घेणे बंधनकारक राहील.

२४) <u>विद्यार्थ्याने ज्या शाळेतून खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी केली असेल त्या शाळेस जे परीक्षा केंद्र आहे त्याच परीक्षा केंद्रावर परीक्षा देणे बंधनकारक राहील.</u>

२५) सदरची योजना सन २०२४ च्या परीक्षेपासून अंमलात येणार असल्याने यापूर्वी जुन्या संपर्क केंद्रामार्फत नाव नोंदणी करून परीक्षेस प्रविष्ठ होऊन अनुत्तीर्ण झाले आहेत तसेच फक्त नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या, मात्र परीक्षेस प्रविष्ट न झालेल्या विद्यार्थ्यांनी त्याच जुन्या शाळेमार्फत आवेदनपत्रे सादर करणे आवश्यक राहील, याची नोंद घ्यावी.

## शालेय श्रेणी विषय

<u>अनिवार्य विषय</u>

१. आरोग्य व शारीरिक शिक्षण (पी १)

आरोग्य व शारीरिक शिक्षण हा शालेय श्रेणीचा अनिवार्य विषय असून या विषयासाठी प्रचलित अभ्यासक्रमानुसार घटक निहाय भारांश देवून क्षमता निश्चित कराव्यात.विद्यार्थ्यांच्या शारीरिक सुदृढतेवर विशेष भर द्यावा. लेखी परीक्षा घेवू नये. तथापि उपक्रमांच्या तात्विक भागाचे लेखन कार्य अपेक्षित आहे. निश्चित केलेल्या क्षमतानुसार प्रथम सत्र व व्दितीय सत्रात स्वतंत्रपणे प्रात्यक्षिक परीक्षा, मैदानी खेळ घेवून मूल्यमापन करावे.

वार्षिक निकालपत्रक तयार करताना प्रथम सत्रातील गुण, व्दितीय सत्रातील गुण एकत्र करून सरासरीनुसार त्या गुणांचे श्रेणीत रूपांतर करावे.

| विद्यार्थ्याचे नाव | प्रथम सत्र | | | द्वितीय सत्र | | | एकूण | सरासरी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लेखन कार्य | प्रात्यक्षिक परीक्षा, मैदानी खेळ | एकूण (अ) | लेखन कार्य | प्रात्यक्षिक परीक्षा, मैदानी खेळ | एकूण (ब) | (अ+ब) | (अ+ब) / २ | |
| | (५०) | (५०) | (१००) | (५०) | (५०) | (१००) | (२००) | (१००) | |
| | | | | | | | | | |

२. जलसुरक्षा (आर ८)

जलसुरक्षा हा विषय इयत्ता १० वीसाठी अनिवार्य श्रेणी विषय म्हणून निर्धारित करण्यात आलेला आहे. या विषयाची मांडणी ही पाठ्यपुस्तक व कार्यपुस्तिका (प्रकल्प व नोंदवही) अशा स्वरूपात करण्यात आलेली आहे. त्यानुसार पाठ्यपुस्तकामध्ये जलशिक्षण, जलसंधारण, जलव्यवस्थापन व जलगुणवत्ता, या घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. तर कार्यपुस्तिकेमध्ये चार प्रमुख घटकांवर आधारीत विद्यार्थ्यांनी करावयाच्या सर्व कृती, उपक्रम आणि प्रकल्पांचा समावेश आहे. त्याविषयी सूचना आणि मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. या विषयाच्या संपूर्ण अध्ययनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी केलेल्या विविध कृती, उपक्रम आणि प्रकल्प यांचे मूल्यमापन करण्यासाठी पुढीलप्रमाणे मूल्यमापन योजना निश्चित करण्यात आली आहे.

| विद्यार्थ्याचे नाव | प्रथम सत्र | | | द्वितीय सत्र | | | उपक्रम व प्रकल्प नोंद वही | एकूण | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | उपक्रम | प्रकल्प | तोंडी / लेखी परीक्षा | उपक्रम | प्रकल्प | तोंडी / लेखी परीक्षा | | | |
| | (२०) | (१५) | (१०) | (२०) | (१५) | (१०) | (१०) | (१००) | |
| | | | | | | | | | |

वरीलप्रमाणे एकूण १०० गुणांपैकी प्राप्त गुणांचे श्रेणीत रूपांतर करण्यात यावे .अ, ब, क श्रेणी उत्तीर्णता तर ड श्रेणी अनुत्तीर्णता दर्शवेल.

(अ श्रेणी- ६० गुण ते १०० गुण, ब श्रेणी- ४५ ते ५९ गुण, क श्रेणी- ३५ ते ४४ गुण, ड श्रेणी ० ते ३४ गुण)

<u>वैकल्पिक विषय</u>

१. स्काऊट गाईड (पी २)

२. एन सी.सी (पी ३)

३. संरक्षणशास्त्र (पी ४)

४. नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा (पी ५)

५. समाजसेवा (पी ६)

६. स्व-विकास व कलारसास्वाद (आर-७)

उपरोक्त सहा वैकल्पिक विषयांपैकी कोणतेही दोन विषय निवडण्यात यावेत .

१) दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यशिक्षण या विषयांतर्गत समाविष्ट असणाऱ्या ०९ विषयांपैकी एका विषयाची निवड संबंधित शाळा स्तरावर करावयाची असून सदर विषयाची दोन्ही सत्रात प्रत्येकी ६० गुण लेखी व ४० गुण प्रात्यक्षिक परीक्षा याप्रमाणे २०० गुण व वार्षिक कामाचे प्रत्येक सत्रात २० गुणांचा प्रकल्प याप्रमाणे ४० गुण, कृतिकार्य प्रत्येक सत्रात २० गुण याप्रमाणे ४० गुण तसेच नोंदवही प्रत्येक सत्रात १० गुण याप्रमाणे २० गुण अशा प्रकारे १०० गुण याप्रमाणे लेखी + प्रात्यक्षिक + वार्षिक काम = एकूण ३०० गुणांपैकी प्राप्त गुणांचे १०० गुणात रुपांतर करुन त्याचे श्रेणीत रुपांतर करून सदर श्रेणी मंडळाच्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या गुणतक्त्या बरोबर विभागीय मंडळाकडे पाठविण्यात यावी. सदर श्रेणीची नोंद विद्यार्थ्यांच्या अंतिम गुणपत्रिकेत दर्शविण्यात येईल.

२) इ. १० वी च्या शालेय श्रेणीच्या वैकल्पिक गटातील स्व-विकास व कला रसास्वाद, समाजसेवा, स्काउट / गाइड, नागरी संरक्षण व वाहतूक सुरक्षा, संरक्षण शास्त्र व एनसीसी या विषयांपैकी एक विषय निवडा यचा असतो. या विषयाची परीक्षा ६० गुणांची लेखी व ४० गुणांची प्रात्यक्षिक परीक्षा असून इतर सर्व विषयाची ५० गुण लेखी व ५० गुण प्रात्यक्षिक + तोंडी अशी प्रत्येक सत्रात घेऊन मिळालेल्या २०० गुणांचे रुपांतर १०० गुणात करुन ती श्रेणी विद्यार्थ्यांच्या अंतिम गुणपत्रिकेत दर्शविण्यात येईल.

३) परीक्षेचे आवेदनपत्र मंडळाने निर्धारित केलेल्या ठराविक मुदतीत विद्यार्थ्यांनी भरले पाहिजे. त्याविषयीच्या सूचना आपल्या शाळेमार्फत दिल्या जातील.

४) पुनर्परीक्षार्थी म्हणून खाजगी विद्यार्थ्यांना परीक्षेस प्रविष्ट होता येईल. त्यासाठी पुढील परीक्षेचे आवेदनपत्रही यापूर्वी नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या शाळेमार्फतच सादर करावे लागेल.

५) परीक्षेचे वेळापत्रक, प्रवेशपत्र, गुणपत्रक, प्रमाणपत्र इ. कागदपत्रे विद्यार्थ्यांना पोहोचविण्याची जबाबदारी शाळेची राहील.

६) सदरील काम करणाऱ्या शाळा मुख्याध्यापक/ ज्येष्ठ शिक्षक व लिपिक यांना या कामाबाबत पुढील दराने मानधन देण्यात यावे.

अ) १. मुख्याध्यापक तथा जेष्ठ शिक्षक

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यंत | रु. १५०/- |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रु. १५०+१०/- प्रती विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रु. ५००/- |

२. लिपिक –

| | |
|---|---|
| १) १० विद्यार्थ्यांपर्यंत | रु. १००/- |
| २) १० पेक्षा जास्त विद्यार्थी | रु. १००+१०/- प्रती विद्यार्थी |
| ३) जास्तीत जास्त | रु. २००/- |

... वाढविणेबाबत ऑनलाईन शाखा, राज्य मंडळ, पुणे–४ यांना लेखी कळविणे आवश्यक आहे, तदनंतरच विद्यार्थी मर्यादा वाढविण्याची कार्यवाही करण्यात येईल.

ई) या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना द्वितीय भाषा (इंग्रजी /मराठी), गणित, सामाजिकशास्त्रे या विषयाच्या स्वाध्यायपुस्तिका ऑनलाइन पद्धतीने मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिल्या जातील. त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

संकेतस्थळ – १) **http://form17.mh-ssc.ac.in**

२) **http://mahahsscboard.in**

| अ.क्र. | विषय | स्वाध्यायपुस्तिका संख्या |
|---|---|---|
| १) | द्वितीय भाषा (इंग्रजी / मराठी) | ०२ |
| २) | गणित भाग - १ (बीजगणित) भाग - २ (भूमिती) : | ०१ |
| ३) | इतिहास व राज्यशास्त्र | ०१ |
| ४) | भूगोल | ०१ |
| | एकूण | ०५ |

सदर स्वाध्याय पुस्तिकांच्या फक्त सरावासाठी प्रिंट काढून घेण्याबाबत तसेच खाजगी विद्यार्थ्यांची नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे तोंडी,अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक व श्रेणी विषयांची परीक्षा घेऊन सदर परीक्षांचे गुणविहित मुदतीत विभागीय मंडळाकडे सादर करणे अनिवार्य असल्याबाबत तसेच नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे त्यांचे सर्व रेकॉर्ड शाळेच्या दप्तरी ठेवणे बाबत संबंधित शाळांना सूचित करावे.

विज्ञान विषयासाठी प्रात्यक्षिक परीक्षा असल्याने सदर विषयासाठी स्वाध्याय पुस्तिका राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

## प्रपत्र – 'अ'

# कोऱ्या कागदावर सादर करावयाचा स्वसाक्षांकित प्रतिज्ञापत्राचा नमुना

(शाळा सोडल्याचा मूळ दाखला गहाळ झालेला असल्यास)

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी विद्यार्थ्यांने सादर करावयाचे

## प्रतिज्ञापत्र

मी (संपूर्ण नाव, आडनाव प्रथम) .......................... श्री/ श्रीमती .............. यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय .......... वर्षे, ............... व्यवसाय, राहणार ............................ सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो / देते की, मी ...................... शाळेमध्ये दिनांक ................. पासून दिनांक ................ पर्यंत शिकत होतो / होते. मी दिनांक ................ रोजी शाळा सोडली आहे.

वर नमूद केलेल्या शाळेकडून मला शाळा सोडल्याचा दाखला मिळालेला होता. सदरचा दाखला मार्च ....... च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट होण्यास परवानगी मिळविण्यासाठी मी सादर करु शकत नाही कारण ..................................................

मी कोणत्याही शाळेमध्ये वर नमूद केलेल्या तारखेनंतर नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतलेला नाही.

वरील माहिती ही माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे संपूर्णरित्या खरी असून खोटी आढळून आल्यास मी शिक्षेस पात्र राहीन, याची मला जाणीव आहे.

विद्यार्थ्याची / विद्यार्थिनीची स्वाक्षरी : ..........................

संपूर्ण नाव : ..................................................................................

ठिकाण व दिनांक : ..........................

---

सत्यापन

मी .................................................................................. [illegible]

करतो / करते की वर नमूद केलेल्या परिच्छेदांमध्ये केलेली विधाने माझ्या माहिती आणि समजुतीप्रमाणे सत्य असून कोणतीही महत्त्वाची माहिती / बाब लपविण्यात आलेली नाही.

स्थळ : स्वाक्षरी :

दिनांक : शपथेवर लेखी जबानी देणाऱ्याचे नाव :

# प्रपत्र – 'ब'

## १८ वर्षेपेक्षा कमी वय असलेल्या विद्यार्थ्यांचे बाबतीत त्यांचे वतीने त्यांच्या पालकाने कोऱ्या कागदावर सादर करावयाचा स्वसाक्षांकित प्रतिज्ञापत्राचा नमुना

(शाळा सोडल्याचा मूळ दाखला गहाळ झाला असल्यास)

**माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट होण्यासाठी सादर करावयाचे**

**प्रतिज्ञापत्र**

मी (संपूर्ण नाव, आडनाव प्रथम) ........................................................................................ सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, माझा पाल्य ................................................................................ वय .......... वर्षे, ................ , राहणार ................................. ........................ शाळेमध्ये दिनांक .................. पासून दिनांक ................ पर्यंत शिकत होता / होती. त्याने / तिने दिनांक .................. रोजी शाळा सोडली आहे.

वर नमूद केलेल्या शाळेकडून त्याला / तिला शाळा सोडल्याचा दाखला मिळालेला होता. सदरचा दाखला मार्च ........ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस प्रविष्ट होण्यास परवानगी मिळविण्यासाठी तो / ती सादर करू शकत नाही कारण ..........................................................................

त्याने / तिने कोणत्याही शाळेमध्ये वर नमूद केलेल्या तारखेनंतर नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतलेला नाही.

वरील माहिती ही माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे संपूर्णरित्या खरी असून खोटी आढळून आल्यास मी शिक्षेस पात्र राहीन, याची मला जाणीव आहे.

विद्यार्थ्याच्या / विद्यार्थिनीच्या पालकाची स्वाक्षरी : ..............................

संपूर्ण नाव : ..........................................................................................................

ठिकाण व दिनांक : ..............................

सत्यापन

मी, .......................................................................................................... वर नमूद केलेल्या विद्यार्थ्यांचा / विद्यार्थिनीचा पालक त्याचे/तिचे वतीने प्रमाणित करतो की, वर नमूद केलेल्या परिच्छेदांमध्ये केलेली विधाने माझ्या माहिती आणि समजुतीप्रमाणे सत्य असून कोणतीही महत्त्वाची माहिती/ बाब लपविण्यात आलेली नाही.

स्थळ : स्वाक्षरी :

दिनांक : शपथेवर लेखी जबानी देणाऱ्याचे नाव :

# प्रपत्र – 'क'

## हमीपत्राचा नमुना

(इ. १० वी ची परीक्षा यापूर्वी दिली नसल्याबाबत)

**हमीपत्र**

मी (संपूर्ण नाव, आडनाव प्रथम) ..........................................................................

श्री / श्रीमती ............................................................ यांचा / यांची मुलगा / मुलगी / पत्नी, वय .......... वर्षे, ................ व्यवसाय, राहणार ............................ सत्य प्रतिज्ञेवर लिहून देतो / देते की, मी ...................... शाळेमध्ये दिनांक ................. पासून दिनांक ............... पर्यंत शिकत होतो / होते. मी दिनांक ................. रोजी शाळा सोडली आहे.

मार्च ...................... होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षेस (इ. १० वी) खाजगीरित्या नाव नोंदवून मी प्रविष्ठ होवू इच्छित आहे. मी असे सत्य प्रतिज्ञेद्वारे लिहून देतो / देते की, मी यापूर्वी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस किंवा इतर कोणत्याही सांविधिक मंडळाची समतुल्य परीक्षा उत्तीर्ण झालेलो / झालेली नाही.

वरील माहिती माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे संपूर्णरित्या खरी असून खोटी आढळल्यास मी शिक्षेस पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

ठिकाण : ..........................

दिनांक : ..........................

विद्यार्थ्याची स्वाक्षरी

(नाव –

मुख्याध्यापकांची स्वाक्षरी

शाळेचे नाव :

# नमुना FORMAT

संपर्क केंद्र माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव------------------
Name of the Contact Centre Secondary School/Junior College ................................................

................................................

शाळा/क.महाविद्यालय सांकेतिक क्र.-----------
School/Jr.College Index No. ................................

युडाइस क्रमांक ----------------
UDISE No. ..................

जन.रजि.नोंदणी क्र.----
General Register Entry No. ....

## खाजगी उमेदवारास दयावयाचे प्रमाणपत्र
(जनरल रजिस्टर ठेवणे)

## Certificate to be given to Private Candidate
(Maintain a General Register)

| अ.क्र. | तपशील | विवरण |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्याचे पूर्ण नांव<br>Name in full of the student | |
| २ | आईचे नाव Mother's Name | |
| ३ | जात व पोटजात<br>Caste and Sub Caste | |
| ४ | राष्ट्रीयत्व Nationality | |
| ५ | धर्म Religion | |
| ६ | जन्मस्थळ Place of Birth | |
| ७ | जन्मतारीख,महिना व वर्ष<br>(ख्रिस्ती शकाप्रमाणे अंकी व अक्षरी)<br>Date of Birth, Month and Year (in figures and words as per Christian calendar) | |
| ८ | मातृभाषा Mother Tongue | |
| ९ | खाजगी विद्यार्थी नोंदणी पूर्वीची शाळा<br>Former School attended by the private candidate | |
| १० | नोंदणी केल्याची तारीख<br>Date of registration | |
| ११ | इ.१०वी/१२वी उत्तीर्ण तारीख<br>Date of Passing Std X/Std XII | |
| १२ | इ.१०वी/१२वी उत्तीर्ण परीक्षा व बैठक क्रमांक<br>Seat No. & Year of Passing Std X/Std XII | |

वरील माहिती ---------------------------------------------------- या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश रजिस्टर नोंदणी क्रमांक----------शाळा सोडल्याचा दाखला क्र.-----------नुसार प्रमाणित करण्यात येत आहे.

The information above is certified as per the admission registration no. ........... and School Leaving Certificate No. ........ of..........................................................School/Jr.College.

दिनांक :----------

Date ................

मुख्याध्यापक/प्राचार्य
संपर्क केंद्र माध्यमिक शाळेचा/कनिष्ठ महाविद्यालयाचा शिक्का
Head Master/Principal
Stamp of the Contact Centre School/Jr.College